माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.८०१४/२१/अ.क्र.५८६१/२४/०१

**Shri. Francis Charlie D'souza**
विरुद्ध
**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.२) एच/पूर्व विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
एच/पूर्व विभाग यांचे कार्यालय, प्लॉट क्र. १३७, टीपीएस ५,
दुसरा रोड, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पू.), मुंबई ४०० ०५५.
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एच/पूर्व विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
एच/पूर्व विभाग यांचे कार्यालय, प्लॉट क्र. १३७, टीपीएस ५,
दुसरा रोड, प्रभात कॉलनी, सांताक्रुझ (पू.), मुंबई ४०० ०५५.
**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १९.११.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि.०६.११.२०२४ रोजी प्राप्त झाली आहे)
विद्यमान जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०१.०५.२०२१ | २३.०६.२०२१ | २५.०३.२०२१ | - |

अपिलकर्तांनी जन माहिती अधिकारी यांचे दि. २३.०६.२०२१ रोजीचे उत्तर संलग्न करुन दि.१६.०७.२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपीलार्थी यांनी त्यांचा माहिती अर्ज दिनांक ०१.०५.२०२१ नुसार "Please provide me file inspection & certify copy of " possession receipt" no. ACHE/35625/AE(M). DATED 07.11.2017 CTS NO. 2364 TO 2377 Village kolekalyan MAkhdoomi Palace Building, Behind Vakola Masjid, St. Anthony Road, Santacruz (E), Mumbai - 400 055.attach with possession Receipt" याबाबतची माहिती मागितलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दिनांक २३.०६.२०२१ नुसार अपिलार्थी यांना कळविले आहे की, अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयातील अभिलेखात उपलब्ध नाही, असे उत्तर दिले आहे.

अपीलार्थी यांचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.२) एच/पूर्व विभाग यांच्या उत्तरामुळे समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे.

प्रथम अपील आदेश अभिलेखात आढळून येत नाही.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि. १६.०७.२०२१ रोजी माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीस अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित आहे.

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि.१६.०७.२०२१ रोजी "विहीत मुदतीत उत्तर न दिल्यामुळे" असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

आयोगातर्फे अपीलार्थी यांना पाठविण्यात आलेली सुनावणी नोटीस परत कार्यालयात आली आहे. सदर नोटीसवर "नोटीस व्हॉट्सअॅप केली असून सदर सुनावणीस उपस्थित राहणार नसल्याचे दुरध्वनीद्वारे कळविण्यात आले आहे".

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोगाच्या निदर्शनास येते की, जेव्हा बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दि. ०७.११.२०१७ रोजी Possession Receipt issue केलेली आहे तेव्हा जन माहिती अधिकारी यांची अशी भूमिका की, सदर माहिती अभिलेखात उपलब्ध नाही व उचित वाटत नाही. या प्रकरणी कोणतेही आदेश पारीत करण्यापूर्वी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. या प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०७.०१.२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Maharashtra

**मुंबई**
**दिनांक :१९.११.२०२४**

**( डॉ.प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**